# प्रकरण पाचवे

## बळीराजा धरण - प्रकल्प उभारणी

## प्रकरण पाचवे

## बळीराजा धरण - प्रकल्प उभारणी

### 5·1 प्रकल्प उभारणी नियोजन :-

दुष्काळ, बेरोजगारी, अनारोग्य, भ्रष्टाचार, वाढती लोकसंख्या या समस्येने देशाला ग्रासले आहे· यावर मात करणे हे एक शासनापुढे आव्हान आहे· परंतु याबाबत शासन गंभीर भूमिका घेत असल्याचे दिसत नाही· सर्वसामान्य जनतेच्या मूलभूत गरजा भागविण्याकडे लक्ष केंद्रित करण्याऐवजी काही मूठभर उच्चवर्गियांच्या गरजा भागविण्याला प्राधान्य देणारी आर्थिक व इतर बाबतीतील धोरणे शासनाकडून आखली जात आहेत· नैतिक मूल्यांचे होत असलेले खच्चीकरण, राजकीय क्षेत्रातील वाढती गुन्हेगारी, भ्रष्टाचार, काळा पैसा वगैरेच्या पार्श्वभूमीवर हितसंबंधीयांनी लोकांचे शोषण चालविले आहे· तर दुस-या बाजूला लोकांमध्ये अतिशय असहाय्यतेची भावना वाढीस लागली आहे·

अशा परिस्थितीत वरील समस्यांवर मात करण्याचे बलवडी-तांदुळवाडीच्या लोकांनी ठरविले· त्यासाठी विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर करून विकासाची योजना निश्चित केली· यासाठी येरळेच्या पाण्याचा जास्तीत जास्त वापर करण्याचे ठरले· यासाठी या नदीचे पावसाळ्यात वाहत जाणारे पाणी धरण बांधून अडविण्याचे ठरले· हे पाणी पावसाळ्या-नंतरच्या टंचाईच्या काळात पिके जगविण्यासाठी उपयोगात आणण्याची ही योजना आहे·

धरण बांधण्याचे कष्टक-यांनी ठरविले, परंतु प्रत्यक्षात प्रकल्प उभारण्यासाठी, अनेक प्रशासकीय कामे करण्यासाठी सेवाभावी कार्यकर्त्यांची आवश्यकता असते, आणि यासाठी मुक्ती संघर्ष चळवळीने ही जबाबदारी स्वीकारली· या चळवळीचे डॉ·भारत पाटणकर, संपतराव पवार, के·जे·जॉय, धनाजी गुरव, जयंत निकम, जयवंत भोसले, श्रीमती इंदुताई पाटणकर यासारखे कार्यकर्ते धरण प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी सतत


कार्यरत राहिली· या मंडळींच्या आणि मुक्ती संघर्ष चळवळीच्या योगदानामुळेच कष्टक-यांचा धरण प्रकल्प पूर्ण झाला·[1]

## 5·2 बळीराजा धरणाचा व बहुउद्देशीय आराखडा :-

बळीराजा धरणाची उभारणी करण्याचा संकल्प सोडला असला तरी प्रकल्प उभारणी करताना प्रथम प्रश्न पुढे आला तो धरणाची जागा निश्चित करण्याचा आणि धरणाच्या प्लॅन इस्टिमेटचा· तेव्हा गावक-यांनी तज्ज्ञांना आवाहन केले· तेव्हा देशात तांत्रिक संशोधनाच्या क्षेत्रात प्रयोगशील व तज्ज्ञ म्हणून सुप्रसिध्द असणा-या श्री·के·आर·दाते यांनी सेवाभावीवृत्तीने मदतीचा हात पुढे केला· त्यांनी बळीराजा धरणाचे प्लॅन इस्टिमेट मोफत करून दिले· इतकेच नव्हे तर प्रकल्प पूर्ण होईपर्यंत सर्व प्रकारची तांत्रिक मदत करण्यात ते सतत अग्रेसर राहिले· हे त्यांनी केवळ दयाबुध्दीने केले नाही तर दुष्काळ हटविण्याचा शास्त्रीय दृष्टिकोन असणा-या एका तज्ञ अभियंत्याचे श्रमदान म्हणून त्यांनी हे केले· असे करून त्यांनी एका नव्या परंपरेची सुरूवात केली·[2] एकंदरीत बळीराजा उभारणीतील दात्यांच्या तंत्रज्ञानाचे श्रमदान अतिशय महत्त्वाचे आहे·

धरणाची जागा निश्चित करण्यासाठी तज्ज्ञ के·आर·दाते यांच्याबरोबर गावातील वृध्द लोकांच्या अनुभवाचाही मोठा उपयोग झाला· एकंदरीत पाण्याची खोली, नदीकाठचा उतार, पाण्यातील खडकांची उपलब्धता, त्यांचा कठीणपणा, खडकांची रचना, वाळूचा साठा, पात्रातील पाणी साठवण्याची क्षमता, चुनखडीचे प्रमाण इत्यादि गोष्टींचा सर्वांगाने विचार करण्यात आला· तसेच या धरणामुळे कुणाच्याही घराला उठावे लागणार नाही आणि त्यामुळे कुणालाही आर्थिक झळ बसणार नाही याचीही दक्षता धरणाची जागा निवडताना लोकांनी घेतली·

बलवडी गावाच्या पूर्वेस अंदाजे अर्धा कि·मी·अंतरावर नदी पात्राची रूंदी कमीत कमी आहे· त्या ठिकाणी धरणाची जागा निश्चित करण्यात आली· या ठिकाणी नदीचे दोन्ही काठ तीव्र उताराचे असून नदीकाठचा हा तीव्र उतार या ठिकाणापासून मागे नदीच्या उगमाच्या बाजूला बराच लांब ‡1000 मीटर्स‡ पर्यंत जातो·· त्यामुळे धरणाचे साठणारे पाणी हे केवळ पात्रामध्ये साठणार होते· शिवाय धरण जेथे बांधायचे त्या ठिकाणी नदीचे पात्रही नैसर्गिकरित्या निमुळते असल्याने बंधा-याची लांबीही कमी




SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

होणार होती· त्यामुळे बंधारा बांधकामाचा खर्चही कमी होणार होता· येथे फक्त 120 मीटर्स इतक्या लांबीची भिंत नदीपात्रात बांधली की, नदीपात्रामध्ये किमान 20·5 द·ल·घनफूट पाण्याचा साठा होणार होता आणि त्यापासून बलवडी-तांदुळवाडी गावातील एक हजार एकर जमीन पाण्याखाली/पिकाखाली येणार होती·[3]

तालिका :- क्रमांक 1

श्री·के·आर·दाते यांनी बळीराजा धरणाचा जो वैशिष्टयपूर्ण आराखडा तयार केला तो पुढीलप्रमाणे आहे·

| | | | |
|---|---|---|---|
| 1· | बंधा-याची लांबी | - | 120 मीटर्स |
| 2· | बंधा-याची उंची | - | 4 मीटर्स |
| 3· | एकूण पाण्याचा साठा | - | 20·5 दशलक्ष घनफूट |
| 4· | एकूण भिजणारे क्षेत्र | - | 380 हेक्टर्स (150मि·मि·वाटपपध्दतीने) |
| 5· | बंधा-याचा एकूण खर्च | - | 03,09,000/- रुपये |
| 6· | जलसिंचन योजनेच्या उभारणीस येणारा खर्च | - | 04,00,000/- रुपये |
| 7· | लाभव्यय प्रमाण | - | 4:6 |
| 8· | फक्त संकरित ज्वारीच्या उत्पादनात संपूर्ण क्षेत्रातील वाढ-पैशात | - | 14,25,000/- रुपये |
| 9· | धरणामुळे निर्माण होणारा चारा (फक्त दुष्काळी परिस्थितीत) | - | 04,00,000/- रुपये |
| 10· | धरणामुळे निर्माण होणारा रोजगार | - | 400 कुटुंबातील 800 लोकांना कायमस्वरुपी |
| 11· | धरणामुळे उठणारी गावे | - | काही नाही |
| 12· | धरणाच्या पाण्याखाली बुडणारी पिकावू जमीन | - | काही नाही |
| 13· | पाणी देण्यामुळे होणारी क्षारयुक्त जमीन | - | काही नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| 14· | धरण लाभक्षेत्राचा फायदा घेण्यासाठी जमीन खरेदी इ· | - | काही नाही |
| 15· | उत्पादन वाढ ﴾उदा·संकरित ज्वारीच्या उत्पादनात होणारी वाढ﴿ | - | 2·5 टन/हेक्टर |

वरील काही ठळक बाबींच्या अभ्यासक्रमातून या धरणाचे बहुउद्देशत्व कळून येते· हे धरण या दृष्टिकोनातून आगळेवेगळे आहे· देशात सध्या अस्तित्वात असलेल्या धरणाच्या आणि पाणी वाटप पध्दतीमध्ये ज्या त्रुटी आहेत त्यापैकी ब-याच अडचणीवर या धरणाने मात केलेली आहे· एकतर 20·5 दशलक्ष घनफूट पाणी साठविणारे धरण एवढया कमी खर्चात ﴾अंदाजपत्रकात 3 लक्ष 9 हजार रुपये दाखविल्याप्रमाणे﴿ पूर्ण होणे ही जवळजवळ दुरापास्त अशी घटना आहे· ती या लोकांनी सिध्द करून दाखविली· धरण बांधत असताना आपल्या गावातील लोकांना रोजगाराची उपलब्धता, पाण्याचे वाटप, प्रत्येकाला पाण्याचा हक्क, स्वयंपूर्ण कुटुंबाच्या उभारणीसाठी योग्य पिकपध्दती, अतिरेकी पाण्यातून जमिनीच्या खार फुटीच्या प्रश्नाचे उच्चाटन इत्यादिबद्दल नियोजनपूर्वक उचललेल्या पावलामुळे या धरणाचे वेगळे अस्तित्व सर्वांनाच जाणवू लागले· ग्रामीण भागातील कष्टक-यांनी शासनाची एक पैचीही मदत न घेता स्वबळावर आणि कमीत कमी खर्चात धरण बांधण्याचा उपक्रम अत्यंत गौरवास्पद आहे· तसेच या धरणामुळे कोणत्याही गावाचे पुनर्वसन करण्याचा, किंवा या धरणाच्या पाण्याखाली थोडीही जमीन बुडण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही· त्यामुळे देशातील इतर धरणापेक्षा हे धरण लोकांना आदर्श ठरणार आहे·

बलवडी व तांदुळवाडीच्या मजूर-कष्टकरी शेतक-यांनी या धरणात साठणा-या पाण्यातून जास्तीत जास्त राबणा-या स्त्री पुरूषांचा दुष्काळ घालविण्याचे तत्व स्वीकारले· पिके नेमकी कुठल्या पावसाच्या दडीमुळे आणि किती कमी पाणी पडल्यामुळे जातात याचा शास्त्रीय विचार करून कमीतकमी पाण्यात जास्तीत जास्त पिकांना सरंक्षण देण्याचे त्यांनी ठरविले· कमी लोकांची ऊसासारखी जास्त पाणी खाणारी पिके जगविण्यापेक्षा कमी पाण्यात जास्तीत जास्त लोकांना जगवणारी पिके घेण्याचे नियोजन त्यांनी केले आणि या सर्वांच्या पुढे जाऊन भूमिहिनसह सर्वांना दरडोई समान पाणीवाटप करण्याचे तत्व स्वीकारून

स्त्री-पुरूषांच्या श्रमाला प्रतिष्ठा द्यायचे ठरविले.

"दुष्काळ जायचा असेल तर पाणी आणि जमीन यांचे शास्त्रीय नियोजन कसे करावे याचा मार्गच त्यांनी व्यवहारात आणायचे ठरविले. याचमुळे "बळीराजा" हे कुठल्याही धरणासारखे एक धरण न रहाता दुष्काळ हटविण्याच्या शास्त्रीय धोरणाचा झेंडा ठरला. सर्व राबणा-यांच्या हितालाच केंद्रस्थानी ठेवून दुष्काळ घालविण्याच्या धोरणाची मशाल ठरला."

यामुळेच श्री.कृष्णा दाते यांनी या धोरणातून धरणाच्या प्लॅन इस्टिमेटमध्ये मांडलेली आकडेवारी फारच मोठे शिक्षण करणारी आहे. ज्यांना नेहमीच्या धरणांची आणि लिफ्ट इरिगेशनची पाणी वाटप पध्दती माहित आहे, त्यांना यातून शिकण्यासारखे बरेच आहे. ज्यांना दुष्काळ हटविण्यात रस आहे. अशा दुष्काळग्रस्त कष्टक-यांना तर शिकण्यासारखे सर्वच आहे.[4]

## 5:3 बळीराजाच्या उभारणीला प्रत्यक्ष प्रारंभ :-

कष्टक-यांनी धरण बांधण्याचे ठरविल्यानंतर ग्रामसभा बोलावून या ठरावाला संमती घेतली. धरण उभारणीसाठी शासनाची परवानगी मिळावी म्हणून सांगली जिल्हाधिका-यांना 16 ऑक्टोबर 1986 ला धरणाच्या प्रस्तावाचे पहिले पत्र मुक्ती संघर्ष चळवळीच्या वतीने दिले गेले. प्रस्ताव सरळ होता. "दुष्काळामुळे उघडया पडलेल्या वाळूच्या संपत्तीमधून आधीच गब्बर असणारे कंत्राटदार अधिकच श्रीमंत होण्याचा आजचा वाळूधंदा बंद करावा. राबणा-या जनतेला परवडू शकणा-या परमिट पध्दतीने वाळू विकण्याचे परवाने सामुदायिक पातळीवर द्यावेत, या विक्रीतून निर्माण होणा-या भांडवलातून व श्रमदानातून राबणारी जनता येरळेत पाणी साठवणारे धरण बांधील." याप्रकारचा हा प्रस्ताव होता. यात स्पष्टपणे सध्याची शेती, खेडी व गावक-यांची परिस्थिती आणि येरळेतील होणारा अतिरेकी स्वरूपातील वाळूचा उठाव व त्यामुळे बिघडत चाललेले नैसर्गिक संतुलन याचा उल्लेख केला होता आणि या वाळूचा उठाव मर्यादित स्वरूपात करण्याची चळवळीची तयारी असून तिला परवानगी मागितली होती. दुस-याने वाळू उचलून अमाप संपत्ती मिळविण्यापेक्षा आपणच वाळूची विक्री करून धरणाची निर्मिती करू असा विचार संघटनेचा होता. जनतेच्या योजनेच्या कुतुहलापोटी शासकीय अधिका-यांनी या संघटनेला वाळू उचलण्याची परवानगी दिली. यानंतर दि.21 नोव्हेंबर, 1986 रोजी हाच प्रस्ताव

नेमक्या स्वरूपात आणि के·आर·दात्यांनी तयार केलेल्या प्लॅन इस्टिमेटसह जिल्हाधिका-यांना पाठविला गेला·

17 ऑक्टोबर 1986 पासून 14 जानेवारी 1987 पर्यंत या प्रस्तावाच्या आधारावर अधिका-यांनी 19 वाळू विक्रीचे (1900 ब्रास) परवाने धरणाच्या भांडवल निर्मितीसाठी चळवळीला दिले· मध्यंतरीच्या काळात काही वेळेला अधिका-यांनी अडवणूकही केली, लिलाव पध्दतीनेच वाळू विक्रीची "कंत्राटे" घ्या असा चळवळीला आग्रह धरण्यात आला· परंतु चळवळीच्या रेटयामुळे परवाने मिळत गेले· कंत्राटी लिलावाची पध्दती चळवळीने नाकारली· हे सर्व जाहीरपणे चालले होते·[5] वाळू विक्रीतून थोडेसे भांडवल चळवळीजवळ जमा झाले होते· म्हणून धरणाच्या निर्मितीला प्रत्यक्ष सुरूवात करण्याचे ठरले·

अ· **बळीराजाची पायाखुदाई :-** बलवडी-तांदुळवाडीच्या कष्टक-यांनी धरणाच्या पायाखुदाईची सुरूवात दैनिक केसरी (पुणे) चे भूतपूर्व संपादक चंद्रकांत घोरपडे यांच्या हस्ते दि·23 नोव्हेंबर 1986 रोजी केली· सध्याच्या शेतक-याला पुराणातील वामनाप्रमाणेच पाताळात गाडू पाहणा-या नैसर्गिक आणि मानवी दुष्काळाचा बीमोड करून, बळीराजाचे म्हणजेच शेतक-यांचे राज्य परत आणण्याचा जणू विडाच कष्टक-यांनी या बलिप्रतिपदेच्या दिवशी उचलला· कष्टक-यांनी श्रमदानाने पायाखुदाईला सुरूवात केली· त्यानंतर शिवाजी विद्यापीठाने दुष्काळ निर्मूलनाच्या जनतेच्या या कार्यातील आपला वाटा उचलला· विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजनेची पायलट पध्दतीने श्रमसंस्कार, युवक शिबिरे धरणाच्या जागेवर आयोजित केली· त्यानुसार अनुक्रमे बळवंत कॉलेज विटा, पद्मभूषण वसंतदादा पाटील कॉलेज तासगाव, कला व वाणिज्य महाविद्यालय कडेपूर आणि ए·एस·सी· कॉलेज रामानंदनगर या महाविद्यालयांनी आपल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या युवकांची शिबीरे घेतली· या विद्यार्थ्यांनी 40 दिवस येथे श्रमदान करून धरणाचा संपूर्ण पाया खोदून काढला· पायाखुदाईनंतर कडेपूर कॉलेजचे तत्कालीन प्राचार्य बी·बी·सावंत यांच्या हस्ते बळीराजा धरणाचा पायाभरणी समारंभ झाला· या कार्यक्रमाचे अध्यक्ष क्रांतीवीर नामदेवराव कराडकर होते· धरणाचे बांधकाम व्यवस्थित सुरू झालेले होते· दि·25 जानेवारी 1987 रोजी क्रांतिवीरांगना लक्ष्मीबाई नायकवडी यांच्या हस्ते आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या

भारत सरकारचे सल्लागार श्री·पी·जी·जवळगी यांच्या अध्यक्षतेखाली धरणाचा कोनशिला समारंभ झाला·

ब· **शासकीय यंत्रणेचा अडथळा :-** बळीराजा धरणाचे काम वेग घेवू लागले· गावकरी आणि विद्यार्थी धडाक्याने काम आटोपत होते· धरणाचे काम अर्ध्याएक फुटापर्यंत पात्राच्यावर आलेले होते· परंतु आमच्या मायबाप सरकारला हे पाहवले नाही· अचानक जादुची कांडी फिरावी तसे घडले· बळीराजा धरण शासनाने अनाधिकृत ठरवले· पुढील बांधकाम करण्यास जिल्हाधिका-यांनी मनाई केली· हजारोंचे उध्वस्त होणारे संसार, दुष्काळातून बाहेर काढणा-या या योजनेला शासनाने खोडा घालून कष्टकरी जनतेच्या जीवनाशी खेळण्याचा प्रयत्न सरकारी अधिकारी करु लागले· वास्तविक धरणाच्या मान्यतेसाठी चळवळीने शासनाकडे औपचारिकपणे निवेदन दिले होते·

"धरणासारख्या योजना अशा वैयक्तिक जबाबदारीवर, इतक्या लोकांच्या सहभागातून, एवढया कमी वेळात, एवढयाशा पैशात जर पूर्ण होऊ लागल्या तर परिस्थिती बिकट येणार हे शासकीय अधिका-यांच्या लक्षात आले· गावक-यांची-नेत्यांची सगळीकडे वाहवा होईल आणि मग आपले काय आणि हे इतके दिवस आपण का करु शकलो नाही याचे पितळ उघडे पडेल याची काळ्जी शासकीय अधिका-यांना वाटू लागली आणि म्हणूनच प्रत्यक्षात सरकारी कायदा व तांत्रिक अडचणी पुढे करुन हे काम बंद पाडण्यात आले·[6]

शासकीय अधिका-यांच्या मते हे धरण सर्व शासकीय नियम, संकेत आणि यंत्रणा झुगारुन देवून बांधण्यास सुरुवात केली आहे· तसेच त्यांच्या मते कुंडल-विटा रस्त्यावर बलवडीजवळ येरळेवर पूल मंजूर झाला आहे· त्याचे काम लवकरच सुरु होणार आहे· या पूलाची जागा नदीच्या प्रवाहात धरणाच्या अलिकडे सुमारे तीनशे मीटरवर आहे· त्यामुळे धरणाच्या तुंबलेल्या पाण्याचा पुलाला धोका आहे· तसेच धरणाचे काम कोणत्या दर्जाचे होणार याचीही शंका व्यक्त केली जाते· त्यामुळे खालच्या गावांनाही धोका संभवतो·[7]

पण हे धरण बंद पाडण्याच्या पाठीमागे तांत्रिक आक्षेप हे एक निमित्त होते· मुख्य कारण मात्र दुसरेच होते याची जाणीव इथल्या जागृत जनतेला होण्यास वेळ लागला नाही· ज्यांनी या धरणाचा प्लॅन [डिझाईन] बनवला होता, त्या के·आर·दाते

यांनी हा शासनाचा हा आक्षेप आपल्या या क्षेत्रातील उत्तुंग ज्ञानाच्या जोरावर सडेतोडपणे खोडून काढला. तरीही बळीराजाच्या पुढच्या कामाला मंजूरी देण्यात संबंधित अधिका-यांनी चालढकलीची भाषा सुरू केली. लोकोपयोगी धरणाच्या कामाबाबत अडवणुकीचे धोरण अधिका-यांनी स्वीकारून जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रयत्न केला तेव्हा लोकांचीही सहनशीलता संपली. मग नाईलाजाने लोक संघर्षासाठी रस्त्यावर आले. कष्टक-यांनी विटा तहसिलदार कार्यालयासमोर 28 दिवसांचे प्राणांतिक उपोषण सुरू केले. यातील काहींना इस्पितळात दाखल करण्यात आले. लढा तीव्र होत होता. सांगलीच्या कलेक्टर कचेरीवर 10 एप्रिल 1987 रोजी बैलगाडी, जनावरे यांच्यासह कष्टकरी जनतेने संयुक्त मोर्चा काढला. जिल्हयातील कष्टकरी, कामकरी, कामगार संघटना, राजकीय पक्ष, सेवाभावी तसेच सामाजिक संघटना या लढयात बळीराजाच्या अस्तित्वासाठी उतरल्या- सांगलीच्या झोपडपट्टी संघटनेने स्वतः या लढयात सहभाग तर घेतलाच त्याचबरोबर मोर्चेकरांना जेवणही पुरविले. तसेच या भागातील स्थानिक वृत्तपत्रांनी हा बळीराजाचा प्रश्न आणि शेतक-यांचा न्याय हक्कांचा लढा उचलून धरला. वृत्तपत्रांचा सहभाग आणि कष्टक-यांची जिद्द, चिकाटी यामुळे हा लढा तीव्र बनला. त्यामुळे सरकार अडचणीत आले होते. मग शासकीय यंत्रणेने दुसराच डाव टाकला. आम्हीच धरण बांधून देतो असे सरकारने आश्वासन दिले. पण सरकारच्या पोकळ आश्वासनावर विश्वास न ठेवता जनतेने लढा चालूच ठेवला. यामुळे सरकारला नमते घ्यावे लागले व धरणाच्या पुढील बांधकामाला शासनाने मंजूरी दिली. पुन्हा वेगाने काम सुरू केले.[8] बळीराजा धरणाच्या 2.5 मीटर उंचीपर्यंतचे बांधकाम पारंपारिक पध्दतीने पूर्ण झाले.

बळीराजा धरण उभारणीसाठी सक्रीय सहकार्य करणा-या व्यक्ती, संघटना, शैक्षणिक संस्था यांचा जाहीर सत्कार बळीराजा धरणकृती समितीने केला. हा सत्कार शे.का.पक्षाचे आ.गणपतराव देशमुख यांच्या शुभहस्ते आणि महाराष्ट्र जनता दलाचे तत्कालीन अध्यक्ष माजी खासदार संभाजीराव काकडे यांच्या अध्यक्षतेखाली 5 मार्च 1989 रोजी झाला. तसेच बळीराजा धरणासाठी मुंबई, पुणे, इचलकरंजी या सारख्या शहरातील आणि ग्रामीण भागातील काही सेवाभावी संस्थांनी बिनव्याजी कर्ज दिले होते. त्या कर्जाची परतफेड दैनिक केसरी (पुणे) चे संपादक मा.शरद्चंद्र गोखले यांच्या शुभहस्ते त्या संस्थांना करण्यात आली. तसेच प्रसिध्द अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्ते निळू फुले यांच्या हस्ते

धरणाचे ॲटोमॅटिक गेट ‌‌(स्वयंचलित दरवाजे) बसविले. या कार्यक्रमास तत्कालीन सांगली जिल्हाधिकारी श्रीधर जोशी उपस्थित होते.

बळीराजा धरणातील पाणीवाटपासाठी "विज्ञानातून मानवमुक्ती"चे ध्येय स्वीकारून "बळीराजा जलसंवर्धन व वितरण विकास संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेच्या कार्यालयाचे उद्‌घाटन साथी बा.न.राजहंस यांच्या हस्ते व साथी बापूसाहेब मगदूम यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

बळीराजाने समान पाणीवाटपाचे धोरण स्वीकारून सामाजिक क्रांती केलेली आहे. या समान पाणीवाटप योजनेचा भूमीपूजन समारंभ दि.19 जुलै 1990 रोजी मा.गजाजनराव कांबळे यांच्या शुभहस्ते व आचार्य शांताराम गरूड यांच्या अध्यक्षतेखाली झाला. समान पाणी पुरवठा योजनेसाठी संरक्षित उपसा जलसिंचन योजना केली आहे. या योजनेच्या वीजपुरवठा कामाचा शुभारंभ म.रा.वि.मं.विटाचे कार्यकारी अभियंता श्री.व्ही.पी.जोशी यांच्या हस्ते आणि प्रा.डॉ.बाबूराव गुरव यांच्या अध्यक्षतेखाली दि.19 ऑक्टोबर 1990 रोजी झाला.

बळीराजा समान पाणीवाटप योजनेचे उद्‌घाटन नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या श्रीमती मेधा पाटकर यांच्या हस्ते व कॉ.गोविंद पानसरे यांच्या अध्यक्षतेखाली दि.7 नोव्हेंबर 1991 रोजी झाले. या समान पाणी वाटप योजनेसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड समारंभ महाराष्ट्र विधानसभेचे उपसभापती मा.मोरेश्वर टेंभुर्डे यांच्या हस्ते तसेच या योजनेतून चारा उत्पादनाचा शुभारंभ आ.दत्ता पाटील यांच्या हस्ते याच दिवशी करण्याचे ठरले होते. तसेच हुतात्मा किसन अहिर सरकारी साखर कारखाना वाळवाच्या चेअरमनपदी सामान्य दलित कुटुंबातील महादेव कांबळे या तरूणाची निवड झाली. ही निवड करून कारखान्याने एक नवा आदर्श राज्यात निर्माण केला. त्याबद्दल याच कार्यक्रमात महादेव कांबळे चा सत्कार बलवडीच्या कष्टक-यांनी केला. या कार्यक्रमास कॉ.मेधा थत्ते, कॉ.नाना शेटे, साथी बा.न.राजहंस, शांताराम गरूड ही मंडळी उपस्थित होती.

## 5·4 बळीराजा उपसा जलसिंचन योजना :-

बळीराजा धरणाची पाणी साठवण क्षमता 20·5 दशलक्ष घनफूट आहे· 150 मिलीमीटर पाणी देण्याच्या पध्दतीने या पाण्यातून 380 हेक्टर क्षेत्र भिजणार आहे· बळीराजा धरण हे लहान स्वरूपाचे धरण आहे· समान वाटपाच्या धोरणासाठी धरणातील पाणी उपसा जलसिंचन योजनेव्दारे वाटप केले जात आहे· धरणातील पाणी लिफ्ट पध्दतीने दिल्यामुळे अधिक क्षेत्र ओलिताखाली येऊन शेतीला आवश्यक तेवढेच पाणी देता येते· त्यामुळे पाण्याचा अतिवापर, नासधूस यांना आळा तर बसतोच त्याचबरोबर जादा पाणी देण्यामुळे निर्माण होणारा खारजमीनाचा प्रश्नही संपुष्टात येतो·

बळीराजा धरणातून तांदुळवाडी गावच्या 300 एकर क्षेत्रासाठी पहिली उपसा जलसिंचन योजना सुरू करण्यात आली आहे· या योजनेसाठी शासकीय अभियंत्यांनी 28 लाख रूपयाचे इस्टिमेट तयार केले होते· परंतु मुक्ती संघर्ष चळवळ आणि बळीराजा धरण कृती समितीने हीच पाणीपुरवठा योजना फक्त 12 लाख रूपयात पूर्ण केली आहे· या धरणातील पाणी उचलण्यासाठी 10 अश्व शक्तीचे पाच विद्युत मोटार पंप बसविण्यात आले आहेत· प्रत्यक्षात 60 अश्व शक्तीची मंजूरी विद्युत मंडळाने दिली आहे· या पाणी वितरण व्यवस्थेसाठी आयात केलेल्या खास कच्चा मालावर आधारलेल्या पी·व्ही·सी·पाईप न वापरता भारतातला पेट्रोलियमजन्य कच्च्या मालाचा उपयोग करून बनविलेली खास प्रायोगिक पाईप वितरणासाठी वापरण्यात आली आहे· तसेच त्यासाठी लागणारे टणक आवरण स्थानिक पातळीवरच तयार केले जात आहे· या पाणी वितरणासाठी चर खोदण्याचे काम तांदुळवाडीच्या शेतक-यांनी श्रमदानाने पूर्ण केले आहे· पाणी वितरण व्यवस्थेसाठी 350 मी·लांबीची मेनपाईप लाईन टाकण्यात आली आहे· या रायझिंग मेन पाईप लाईनच्या पुढे 350 मी·लांबीची एक फूट व्यासाची ग्रायव्हटी मेन पाईपलाईन केली आहे· या पाईपच्या एका मीटरची फेरोसिमेंट कव्हरसह किंमत 50 रूपये आहे· परंतु तीच किंमत लोंगक्रेएझिव्ह मेनसाठी 400 रूपये मीटर असते· या प्रकारे कमीत कमी खर्चात शास्त्रीय दृष्टिकोण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तांदुळवाडी गावाच्या 105 सभासदांच्यासाठी पाणी वितरण व्यवस्था कार्यान्वित केली आहे·[9] या वितरण व्यवस्थेत आयातींवर आधारलेल्या वस्तू निर्मितीला पर्याय दिला आहे·

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## 5·5 धरण बांधणीसाठी विविध संस्थांचे योगदान :-

### 1· मुक्ती संघर्ष चळवळ :-

बळीराजा स्मृती धरणाची निर्मिती कष्टकरी जनतेने केली असली तरी या धरणाच्या उभारणीत मुक्ती संघर्ष चळवळीचे स्थानही महत्त्वपूर्ण आहे· महाभारतातील धर्मयुध्दात श्रीकृष्णाची भूमिका ज्या पध्दतीने अतिशय महत्त्वाची होती त्याचप्रमाणे बळीराजा धरण चळवळीचे नेतृत्व करून मुक्ती संघर्ष चळवळीने ही योजना यशस्वीपणे पूर्ण केली आहे· खानापूर तालुक्यातील सततचा दुष्काळ लोकांनीच हटविला पाहिजे, त्यासाठी स्वतःच धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासनास भाग पाडले पाहिजे हा मूलमंत्र जनतेला देवून धरणाची उभारणी करून कष्टकरी जनतेला स्वावलंबी आणि निर्भर बनविण्याचा प्रयोग सिध्दीस नेला आहे· जनमताच्या पाठिंब्याने शासकीय विरोध मोडून बळीराजाच्या रूपाने पर्यायी विकासनीतीचे तत्वच चळवळीने अंमलात आणले आहे· एकंदरीत मुक्ती संघर्ष चळवळीच्या सहभागामुळे कष्टक-यांचे हे स्वप्न साकार झाले आहे·

### 2· बळीराजा धरण कृती समिती :-

बळीराजा धरणाच्या उभारणीत धरण कृती समितीचा सहभागही महत्त्वाचा आहे· धरण बांधण्याचे निश्चित झाल्यानंतर दोन्ही गावातील काही कार्यकर्ते आणि मुक्ती संघर्ष चळवळीचे काही कार्यकर्ते यांची संपतराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली बळीराजा धरण कृती समिती स्थापना करण्यात आली· त्यामध्ये एकूण 13 सभासदांचा समावेश करण्यात आला आहे· अर्थात मुक्ती संघर्ष चळवळीच्या तीव्र लढयामुळे आणि महत्त्वपूर्ण योगदानामुळे धरण पूर्ण झाले आहे· तसेच कृती समितीमध्ये चळवळीचे कार्यकर्ते असल्यामुळे तिचे स्वतंत्र अस्तित्व जाणवत नाही·

### 3· सेवाभावी संस्था व वृत्तपत्रे :-

बळीराजाच्या उभारणीसाठी महाराष्ट्रातील अनेक सेवाभावी संस्थांनी, व्यक्तींनी आपापल्या परीने मदत केली आहे· धरणाचे प्लॅन इस्टिमेट सिंचनतज्ज्ञ श्री·के·आर· दाते यांनी मोफत करून दिले· सांगली, कोल्हापूर, पुणे, मुंबई, इचलकरंजी येथील सामाजिक आणि सेवाभावीवृत्तीच्या संस्थांनी बळीराजाला सक्रीय पाठिंबा दिलेला आहे· के·बा·न·राजहंस, संभाजी काकडे, नागनाथ नायकवडी, मुकुंदराव किर्लोस्कर, गजानन

कांबळे, आ·संभाजी पवार, आ·प्रा·शरद पाटील, मृणालताई गोरे, दि·बा·पाटील, ग·प्र·प्रधान, शांताराम गरूड, गोविंदराव पानसरे, दत्ता पाटील, निळू फुले, शबाना आझमी, मेधा पाटकर, विजय तेंडुलकर या सारख्या अनेक सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांनी या धरणासाठी नैतिक पाठिंबा तर दिलाच शिवाय धरण बांधकामातील अडचणीच्या वेळेला सर्व प्रकारची मदत केली· धरणाची मंजूरी आणि वाळू विक्री परवानाबाबत उभारलेल्या लढयात राज्यातील डाव्या विचारांच्या पक्षांनी सक्रिय पाठिंबा दिला होता· तसेच मुंबईच्या "आव्हान नाटय मंच"ने येरळेच्या खो-यात पायी प्रवास करून बळीराजावरील अन्यायाला जनजागृती करून वाचा फोडली· सांगलीच्या महिला आघाडी, झोपडपट्टी संघटना, हमाल संघटना, कामगार संघटना या धरणाच्या पूर्णत्वासाठी सदैव चळवळीच्या पाठीशी राहिल्या·

या परिसरातील सांगली केसरी, कोल्हापूर सकाळ, पुढारी, अग्रदूत, मुंबई लोकसत्ता, अशासारख्या अनेक वृत्तपत्रांनी तसेच "श्री" किर्लोस्कर, या सारख्या पुण्या-मुंबईकडील साप्ताहिकांनी तसेच आंतरराष्ट्रीय वाचले जात असलेल्या फ्रंटलाईन व इतर मासिकांनी बळीराजाचा प्रश्न सतत उचलून धरला आणि बळीराजाचा लढा यशस्वी करून दाखविला· सांगली आकाशवाणी केंद्रानेही बळीराजा धरणाच्या संदर्भात वेळोवेळी महत्त्वपूर्ण कार्यक्रम सादर करून चळवळीला प्रसिध्दी दिली· एकंदरीत वृत्तपत्रांच्या पाठिंब्यामुळे, लोकांच्या चळवळीमुळे, सामाजिक संस्था सहभागामुळे आणि शिवाजी विद्यापीठाच्या सहकार्यामुळे बळीराजा धरण लवकर पूर्णत्वाकडे पोहोचू शकले·

### 4· शिवाजी विद्यापीठाची राष्ट्रीय सेवा योजना :-

बळीराजा परिसर हा शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात येतो· या विद्यापीठाची स्थापनाच मुळात ग्रामीण भागाच्या विकासाचे ध्येय स्वीकारून 1962 मध्ये झाली आहे· तत्कालीन महाराष्ट्रीयन नेत्यांनी रयतेचा राजा शिवाजी महाराज यांच्या नावाने जनहितासाठी हे विद्यापीठ सुरू केले· हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी खानापूर तालुक्यातील जनतेने शिवाजी विद्यापीठावर मोर्चा नेवून खडबडून जागे केले· विद्यापीठाला बळीराजाच्या मदतीसाठी हाक दिली· विद्यापीठाच्या पदाधिका-यांशी चर्चा सुरू ठेवल्या· "दरवर्षी पडणा-या दुष्काळाचे निर्मूलन करण्यासाठी तुम्हा बुध्दीमंत संशोधकांकडे उपाय

शोधण्याची जबाबदारी आहे. तुमच्या कार्यक्षेत्रात कित्येक महाविद्यालये दुष्काळी भागात आहेत. तिथले विद्यार्थी-पालक होरपळत आहेत. त्यावर उपाययोजना करण्याची सरकारची जबाबदारी असली तरी विद्यापीठाने आपला वाटा उचलला पाहिजे. तुमच्या लोकांची बुध्दी आणि राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेनेसारख्या उपक्रमातून श्रमणारे विद्यार्थ्यांचे हात यांचे सहाय्य आम्हाला द्यावे" अशा प्रकारची मागणी कष्टक-यांनी केली.[10]

विद्यापीठाचा प्रतिसाद मिळाला. सातारा व सांगली जिल्हयातील बारा महाविद्यालयामधून चळवळीच्या सहकार्याने दुष्काळ निर्मूलनाची अभ्याससत्रे झाली. तसेच विद्यापीठात खानापूर तालुका दुष्काळ निर्मूलन समिती स्थापन केली. या समितीने खानापूर तालुक्याचा संपूर्ण अभ्यास केला. यातून बळीराजा धरणाचा प्रस्ताव पुढे आला. बळीराजा उभारणीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीरे धरणाच्या ठिकाणी योजना प्रमुखांची खास परवानगी आणून विद्यापीठाने घेतली. विटा, तासगाव, कडेपूर, रामनंदनगर येथील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी वर्षात 120 दिवसाचे श्रमदान करून बळीराजा धरण उभारणीतील आपला खारीचा वाटा उचलला. धरणाचा संपूर्ण पाया महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी श्रमदानाने सामाजिक कर्तव्यापोटी खोदून काढला. या युवक शिबीराच्या काळात शिवाजी विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरू के.बी.पवार, योजनाप्रमुख श्री.आर.एस.माने यांनी प्रत्यक्ष भेट देवून बळीराजा उभारणीस सहकार्य केले. एकंदरीत बळीराजाच्या उभारणीत शिवाजी विद्यापीठ आणि राष्ट्रीय सेवा योजनांचे योगदानही महत्त्वाचे आहे.

## 5.6 बळीराजा धरण भांडवल उभारणी :-

बलवडी-तांदुळवाडीच्या कष्टक-यांनी मुक्ती संघर्ष चळवळीच्या मदतीने बळीराजा धरणाची कार्यवाही सुरू केली. दोन्ही गावातील प्रत्येक घरातून एक दोन माणसे बळीराजाच्या ठिकाणी श्रमदान करू लागली. हे धरण लोकशक्तीतून निर्माण करण्याचे ध्येय कोल्हापूर फडपध्दतीवरून स्वीकारले होते. कष्टक-यांच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाला महाराष्ट्रातील सर्व थरातील जनतेचा आशीर्वाद होता. परंतु शासनाचा या धरणाला प्रथमपासून विरोध होता. शासनाचा हा विरोध लोकलढयाच्या आधारावर मोडून काढला आणि ही योजना पूर्ण करण्यासाठी पुढीलप्रमाणे भांडवल गोळा करण्यात आले.

1. <u>भाग भांडवल</u> :-

बळीराजा धरणातील पाणी वाटप हे न्याय पध्दतीने म्हणजेच समान पध्दतीने वाटण्याचे ठरले. त्यानुसार बलवडी व तांदुळवाडी गावातील 5 माणसांच्या एका कुटुंबाला एक शेअर्स म्हणजेच 150 मि.मि.पाण्याचा वाटा देण्याचे ठरले. या शेअर्सची किंमत नाममात्र म्हणजे 10 रूपये ठरविण्यात आली. ही रक्कम भागीधारकाने रोख देवून अगर एका व्यक्तीने एक दिवसाचे श्रमदान करून एक शेअर्स खरेदी करता येत होता. एका कुटुंबाला एकच शेअर्स खरेदी करता येत होता. या शेअर्स विक्रीतून या धरणासाठी 5,950 रूपये इतके भांडवल चळवळीने जमा केले.[11]

2. <u>श्रमदान</u> :-

बळीराजा धरण हे श्रमदानातून उभे करण्याचे कष्टक-यांनी ठरविले होते. म्हणून या दोन्ही गावातील लोक बळीराजावर श्रमदान करीत होते. येथील लोकांचा हा विकासाचा उपक्रम स्वबळावर उभे करण्याचा प्रयोग पाहून महाराष्ट्रातील अनेक संस्था, संघटना, व्यक्ती मदतीसाठी धावून आल्या. परंतु चळवळीने कुणाचीही मोफत आर्थिक मदत घेतली नाही. तेव्हा या संघटनांनी स्वतःहून या ठिकाणी येऊन श्रमदान केले. त्यामध्ये के.आर.दाते या प्रसिध्द शास्त्रज्ञ अभियंत्याने धरणाचे प्लॅन इस्टिमेट मोफत करून देवून एका वेगळया प्रकारच्या श्रमदानाची सुरूवात केली.

. याशिवाय राज्यातील बुध्दीवंत मंडळी, सेवाभावी संस्था, शिक्षण संस्था, तरूण, विद्यार्थी वर्ग, कामगार, मजूर संघटना यांनीही धरणावर येऊन प्रत्यक्ष श्रमदान केले. यामध्ये प्रामुख्याने विटा, कडेपूर, रामानंदनगर, तासगाव येथील महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी आणि शिक्षक, वेणूताई चव्हाण कॉलेज कराड, के.बी.पी. कॉलेज इस्लामपूर, विटा हायस्कूल, पंचक्रोशी हायस्कूल बोरगाव (तासगाव), कामेरी व कुंडल हायस्कूल, पलूस तसेच परिसरातील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमिक शाळा, या भागातील प्राथमिक शाळा इ.शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि शिक्षक वर्गाने वेळोवेळी स्वयंस्फूर्तीने येऊन श्रमदान करून बळीराजाच्या उभारणीतील आपला वाटा उचलला आहे. तसेच सांगली बार असोसिएशन, वीर सेवा दल सांगली, होमगार्ड, कामगार, स्वातंत्र्यसैनिक, संघटना सांगली, झोपडपट्टी संघटना सांगली अशासारख्या संघटनांच्या कार्यकर्त्यांनी येथे येऊन श्रमदान केले. अशा पध्दतीने

अनेक सामाजिक, शैक्षणिक संघटनांनी बळीराजा उभारणीसाठी श्रमदान केले.

3. **वाळू विक्री :-**

बळीराजाच्या उभारणीला सुरुवात श्रमदानाने झाली. परंतु निव्वळ श्रमदानालाही मर्यादा असते. दररोज धरणासाठी कष्ट करायचे तर घर कसे चालायचे, तसेच धरणाच्या बांधकामासाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री खरेदी कशी करायची हा प्रश्न कार्यकर्त्यांच्यापुढे होता. यातून मार्ग काढण्यासाठी वाळू परवाने घेऊन पैसा जमा करण्याचे ठरले. आतापर्यंत येरळेतील वाळू कंत्राटदार उचलत होते. वाळू विकून ते गब्बर झाले होते. हा वाळूचा झरा धरणाच्या भांडवलासाठी उपयोगात आणण्यासाठी चळवळीने वाळू विक्रीचे परवाने विटा तहसीलदार कार्यालयाकडून मिळविले. या वाळू विक्रीतून 30 एप्रिल 1990 अखेर मुक्ती संघर्ष चळवळीला 12,33,858 रुपये उत्पन्न मिळाले.[12] आणि यातूनच बळीराजा धरण बांधकाम शक्य झाले. एकंदरीत येरळेच्या वाळूचा बळीराजाच्या उभारणीत अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे.

4. **परतफेड निधी :-**

वाळू विक्रीच्या पैशातून बळीराजा धरणाचे बांधकाम चालू असतानाच मध्यंतरीच्या काळात काही वेळेला शासनाने वाळू परवाने देण्याचे बंद केले. त्यामुळे धरणाच्या बांधकामासाठी भांडवलाची गरज भासू लागली. भांडवलाअभावी काम बंद ठेवण्याची परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा धरण चळवळीने महाराष्ट्रातील सामाजिक संघटना, व्यक्ती यांना बळीराजा धरणाच्या बांधकामासाठी आर्थिक सहाय्य करण्याचे आवाहन केले. हे आर्थिक सहाय्य परत करण्याच्या बोलीवर (उसने) देण्याचे आवाहन केले. या चळवळीने देणगी म्हणून एक पैसाही घेतला नाही. कारण कोणी मोफत देतो म्हणाले की पसरलेला हात पुढे पुढे वाढत जातो व माणसाचे कर्तृत्व कमी कमी होत जाते, असे संघटनेचे मत आहे. म्हणून इचलकरंजी येथील गजानन कांबळे, सांगली, कोल्हापूर, पुणे येथील काही सेवाभावी संस्था, सेवावृत्तीच्या व्यक्ती यांनी टंचाईच्या काळात बळीराजा धरणासाठी एकूण 1,64,720/- रुपये उसने दिले.[13] नंतरच्या काळात चळवळीने हे घेतलेले पैसे, वाळू विक्री करून संबंधित संस्था, व्यक्ती यांना समारंभपूर्वक परत केले. याप्रकारे बळीराजाच्या भांडवल टंचाईच्या काळात परतफेड निधी धरण बांधकाम करण्यास अत्यंत मोलाची ठरली.

एकंदरीत भागभांडवल, वाळू, परतफेड निधी आणि अनेक व्यक्तींचे श्रमदान यामुळे बळीराजा स्मृती धरण उभे राहिले.

## xxx संदर्भ xxx


1· गोफणे बी·एन·"बळीराजा स्मृती धरण" लोकसंख्येच्या जाणीव जागृतीव्दारे एक विकास चळवळ §संशोधन प्रकल्प§, वेणूताई चव्हाण कॉलेज कराड, 1990,पृ·27

2· पाटणकर भारत व पवार संपतराव, "बळीराजा स्मृती धरण",माहिती पुस्तिका,पृ·10

3· गोफणे बी·एन, उ·नि·पृ·28

4· पाटणकर भारत व पवार संपतराव, उ·नि·पृ·11

5· तत्रैव,

6· आपटे वसंत, "बळीराजा बंधारा : तडजोडीने की संघर्षातून", दै·केसरी, सांगली, दि·12/4/1987

7· तत्रैव

8· कांबळे मधु, "सरकारला शह देणारा सांगलीचा बळीराजा", "श्री"§साप्ता·§, मुंबई, दि·27 मे 1989, पृ·20

9· पाटणकर भारत यांच्या दि·29/12/1993 च्या प्रकट मुलाखतीवरून उद्धृत·

10· आपटे वसंत, उ·नि·

11· मुक्ती संघर्ष चळवळ "खेडयातील गरीबांची झुंज"
बळीराजा संवर्धन व वितरण विकास संस्था बलवडी-तांदुळवाडी, पृ·4

12· तत्रैव, पृ·4

13· तत्रैव, पृ·4


SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR